Estd. 9th Aug 1990

श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे

# विलास तांबे शिक्षणशास्त्र महाविद्यालय

# (बी.एड्.)


डुंबरवाडी(ओतूर), ता. जुन्नर, जि. पुणे-४१०५०४

NCTE नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न College ID : PU/PN/B-Ed-/245/2006






## आशिर्वाद



### परमपूज्य श्री गजानन महाराज (शेगाव, महाराष्ट्र)

उपासनेला द्रुढ चालवावे। भूदेव-संतासी सदा नमावे।
सत्कर्मायोगे वय घालवावे। सार्वामुखी मंगल बोलवावे।।



## शिक्षणमहर्षी स्व. विलासराव तांबे (सर)

संस्थापक - श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ

# गुरुजन



**आदरणीय मा. शरदचंद्रजी पवार साहेब**

मा. कृषी मंत्री, भारत सरकार

## आमची प्रेरणा



**मा. ना. अजितदादा पवार साहेब**

उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य



**मा. सौ. सुप्रियताई सुळे**

खासदार – बारामती

## अध्यक्ष मनोगत



कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषू कदाचन्! या उक्तीप्रमाणे महर्षि धोंडो केशव कर्वे,महात्मा जोतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज यांचा शिक्षणाचा वारसा जपण्याची शक्ती व प्रेरणा आम्हाला आमचे वडील स्व. विलासराव तांबे सर (संस्थापक अध्यक्ष, श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतूर) यांच्या विचारांतून व मार्गदर्शनातून मिळाली आहे. वडिलांच्या आशीर्वादाने समाजाने माझ्यावर विश्वास दाखवून समाजाची सेवा करण्याची संधी मला पुणे महानगरपालिकेत नगरसेवक व स्थायी समिती, अध्यक्ष रूपाने प्राप्त झाली. विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविणारे सक्षम, कौशल्यपूर्ण शिक्षक व सर्वगुणसंपन्न नागरिक घडवून देशाच्या विकासास हातभार लावण्यासाठी संस्था व महाविद्यालय कटिबद्ध व प्रयत्नशील राहील. शिक्षक हा समाज घडविणारा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. एक शिक्षक असंख्य चांगले नागरिक घडवतो. त्यांच्या संस्काराची शिदोरी घेऊन अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटवतात. एक मुलगी साक्षर असेल, तर दोन घरी ज्ञानाचा दिवा लावते. तीच मुलगी शिक्षक असेल, तर हजारो कुटुंबांमध्ये ज्ञानाचा दिवा लावेल. श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,विलास तांबे शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे शिक्षणासाठी आपला प्रतिसाद मिळावा व राष्ट्र उभारणीमध्ये आपले सहकार्य लाभो.

**श्री. विशाल विलास तांबे**
अध्यक्ष
श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतूर,
शिक्षणमहर्षि स्वर्गीय विलास तांबे फाऊंडेशन,
नगरसेवक, पुणे महानगरपालिका,
माजी स्थायी समिती अध्यक्ष, पुणे महानगरपालिका

## सचिव मनोगत......



शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. या उक्तीप्रमाणे साक्षरतेचा नुसता ध्यास नाही, तर सबल, स्वकर्तुत्ववान, कौशल्यपूर्ण पिढी घडविण्यासाठी चांगले शिक्षक घडविणे आवश्यक आहे. या विचाराने प्रेरित होऊन समाजसेवेच्या वृत्तीतून ज्ञानदानाचे कार्य आम्ही करत आहोत. प्रत्येक व्यक्ती शिक्षित व उच्च विद्याविभूषित झाली, तर कुटुंबाचा, गावाचा , राज्याचा व पर्यायाने संपूर्ण देशाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही, या ध्यासाने प्रेरित होऊन काम करत आहोत. श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, विलास तांबे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या माध्यमातून उत्तम, व्यासंगी व तंत्रस्नेही भावी शिक्षक घडविण्याचे कार्य आम्ही करत आहोत. ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षक प्रशिक्षण देण्यास व समाज बांधणीस हातभार लावण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. या महान कार्यास आपले सहकार्य लाभो, हीच अपेक्षा!!!

**श्री. वैभव विलासराव तांबे**
सचिव
श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतूर

---

**प्राचार्यांचे मनोगत.......**



डॉ. वसुदेव व्ही राऊत
M.A., M.Ed., M.Phil,
Ph.D SET, NET
प्राचार्य

प्रिय विद्यार्थ्यांनो, श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, विलास तांबे शिक्षणशास्त्र विद्यालय, डुंबरवाडी (ओतूर) मध्ये आपले स्वागत आहे. मागील १६ वर्षांपासून आमचे महाविद्यालय उत्तम शिक्षक प्रशिक्षणासह व कौशल्याधिष्ठित भावी शिक्षक घडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, वैयक्तिक, सामाजिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक व पर्यायाने सर्वांगीण विकासासाठी कार्यतत्पर असणाऱ्या महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून कार्यरत असल्याचा मला खूप अभिमान वाटतो. शैक्षणिक प्रणालीमध्ये अनेक आव्हाने व उत्कृष्ट शिक्षकांची कमतरता आहे. नवीन तर्क, कल्पना आणि नाविन्यपूर्ण विचारांना चालना देण्यासाठी शिक्षण प्रक्रिया अधिक गतिशील करणे आवश्यक आहे व त्यासाठी उत्तम शिक्षक घडणे अत्यंत आवश्यक आहे.

सर्जनशील शिक्षक शिक्षण व प्रशिक्षण हे आमचे ध्येय आहे. सक्षम समाजासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणे, न्याय्य मानवी समाज घडविणे व भावी शिक्षकांमध्ये आत्मविश्वास, उत्तम अध्यापन कौशल्ये यांची रुजवणूक करणे, समाजातील विविध आव्हाने पेलण्यासाठी प्रभावी कौशल्ये, ज्ञान आणि दृष्टिकोन प्रदान करणे,यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

शिक्षक प्रशिक्षण हा शिक्षकी प्राविण्य आणि क्षमतेच्या विकासाशी संबंधित असा अभ्यासक्रम आहे, जो शिक्षकाला शिक्षकी पेशाच्या गरजा पूर्ण करण्यास आणि त्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम बनवतो. आपल्या दोन वर्षांच्या बी.एड्. अभ्यासक्रमादरम्यान आपण असंख्य उपक्रम करावेत,अशी आमची अपेक्षा आहे. सदर शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम तुम्हाला समृद्ध संस्थात्मक अनुभव देईल, तुमचे विषय ज्ञान वाढवेल, तुमची विचारशक्ती वाढवेल आणि तुमचे व्यावसायिक कौशल्ये व संपर्क वाढतील.

आमच्या महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रमांव्यतिरिक्त विविध अभ्यासेत्तर व अभ्यासपूरक उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांचा सामाजिक विकास, नेतृत्व गुण,आवडी-निवडी, सामाजिक बांधिलकी यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले जातात. सर्वगुणसंपन्न भावी शिक्षक घडविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.

# महाविद्यालया विषयी.....

एक मुलगी शिक्षित झाली तर सर्व कुटुंब शिक्षित होईल, या भावनेने प्रेरित होऊन आपल्या परिसरातच मुलींना शिक्षक प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये ओतूर पासून ०३ कि.मी. अंतरावर डुंबरवाडी याठिकाणी मुलींसाठी बी. एड. व एम. एड अभ्यासक्रमांच्या सुरुवातीसह शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्रवासाला सुरुवात झाली. महाविद्यालयाच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून २२५विद्यार्थी विविध स्तरावरील शिक्षक प्रशिक्षणाचे धडे घेऊ लागले. महाविद्यालयाने २००८ साली राज्यस्तरीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय लोकनृत्य स्पर्धा घेण्यास सुरुवात केली. अल्पावधीतच या राज्यस्तरीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय लोकनृत्य स्पर्धेने मोठा नावलौकिक प्राप्त केला. या स्पर्धेला संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून प्रचंड प्रतिसाद प्राप्त झाला. सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून स्थानिक लोकांच्या गरजांचा विचार करून महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे सहशिक्षण महाविद्यालयात रूपांतर करण्यात आले. महाविद्यालयातून अद्यापपर्यंत विविध स्तरावरील जवळपास २००० शिक्षक - शिक्षिका यांनीशिक्षक प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षापासून महाविद्यालय राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (NCTE) नवीन धोरणानुसार दोन वर्षीय बी. एड. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शिक्षक प्रशिक्षणाचे कार्य पार पाडत आहे. मागील ०५ वर्षापासून आम्ही तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व विविध सृजनशील उपक्रमांच्या माध्यमातून उत्तम उत्तम शिक्षक घडविण्याचे कार्य पार पाडत आहोत.

महाविद्यालय समाजाचा जबाबदार घटक या नात्यानेविविध विषयांवरील ऑनलाइन वेबिनार, लेक्चर,मार्गदर्शन या माध्यमातून विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांना उपयुक्त असणारे मार्गदर्शन पुरविण्याचा प्रयत्न करत आहे. हे सर्व उपक्रम राबवत असताना प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या हिरीरीने व एकसंघ पद्धतीने कार्य करतात.

---

**Vision:**

एकात्मिक अध्यापनशास्त्र आणि मार्गदर्शनाद्वारे वैयक्तिक प्रशिक्षण देणे, बौद्धिक, सांस्कृतिक, सामाजिक, भावनिक, शारीरिक, नैतिक आणि आध्यात्मिक विकासासाठी सर्वांगीण शिक्षण व प्रशिक्षण देणे,आयसीटी आणि नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापरकरून शिक्षकांसाठी सेवा-प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे,दस्तऐवजीकरण आणि संशोधन यावर भर देणे,शाश्वत विकासासाठी पर्यावरण शिक्षण व महिला शिक्षणासह समाजाचे सशक्तीकरण यावर भर देणे, यासाठी महविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे.

**Mission:**

विद्यार्थ्यांमधील व्यावसायिक शिक्षणाच्या क्षमतांना प्रोत्साहन देणे,मानवतावादी कौशल्यांबरोबरच शिक्षणातून व प्रशिक्षणातून तंत्रज्ञानाचे अभिनव, नावीन्यपूर्ण, सृजनशील आणि पद्धतशीरपणे एकत्रिकरण करणे व कौशल्यसंपन्न व ज्ञानसंपन्न शिक्षक घडविणे,विद्यार्थ्यांना सक्षम बणविण्यासाठीत्यांच्यात समजदारपणा, जबाबदारपणा व तांत्रिक कौशल्ये विकसित करणे,अनुभवावर आधारित शिक्षणासाठी संधी देऊन शिक्षण व व्यवस्थापनाच्या सर्व क्षेत्रात कार्यक्षम होण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये विकसित करणे,समकालीन कौशल्ये आणि त्यांच्या वापराबद्दल चांगले वैचारिक आकलन विकसित करणे,विद्यार्थ्यांना कोणत्याही वातावरणात सहजतेने कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी कार्यात्मक ज्ञान आणि दृष्टीकोन तयार करणे,जेणेकरून ते त्यांच्या क्षमतांचा वापरसमाज तसेच राष्ट्र निर्मितीच्या व विकासाच्या कार्यात करू शकतील.

## महाविद्यालयात उपलब्ध सुविधा



प्रशस्त इमारत



सुसज्ज ग्रंथालय



संगणक व wi-Fi सुविधा



प्रशस्त अध्यापन कक्ष



सुसज्ज सेमिनार हॉल



वाचन कक्ष

## महाविद्यालयात उपलब्ध अभ्यासक्रम

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित २ वर्षाचा अभ्यासक्रम**

## बी.एड्.

### प्रवेश पात्रता:

- B.A., B.Com., B.Sc., B.E., BCA, BBA, M.A., M.Com., M.Sc **अभ्यासक्रम उत्तीर्ण विदयार्थी.**
- **सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्य सामयिक प्रवेश कक्ष, मुंबई यांच्यामार्फत दरवर्षी घेण्यात येणारी सामयिक प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण असणेआवश्यक.**

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

1. B.Ed. CET Application Form,
2. B.Ed. CET Hall Ticket,
3. B.Ed. CET Score Card,
4. 10th Mark sheet,
5. 12th Mark sheet,
6. B.A./B.Com./B.Sc.or Any Other GraduationMark sheet,
7. M.A./M.Com./M.Sc. Any Other Post Graduation Mark sheet,
8. Transfer Certificate/Leaving Certificate (TC/LC)
9. Migration Certificate (For Other University Student),
10. Gap Certificate (If Required),
11. Domicile Certificate,
12. Marriage Certificate/Gazette (For Married Women Candidates),
13. Cast Certificate (For SC/ST/NT/OBC/SBC Candidates),
14. Non Creamy layer Certificate (For OBC/NT Candidates),
15. Cast Validity Certificate (For SC/ST/NT/OBC/SBC Candidates),
16. Passport size Photos - 03,
17. Scanned Copies of all above documents & 1 set of Xerox copies



# अभ्यासक्रम

## बी. एड्.प्रथम वर्ष अभ्यासक्रम

| कोर्स क्रमांक | विषयाचे शीर्षक | गुण |
|---|---|---|
| | **अनिवार्य विषय** | |
| बी. एड्. १०१ | बाल्यावस्था व वाढते वय | ८० + २० गुण |
| बी. एड्. १०२ | समकालीन भारतीय शिक्षण : लिंगभाव व समाज | ८० + २० गुण |
| बी. एड्. १०३ | अध्ययन व अध्यापन | ८० + २० गुण |
| बी. एड्. १०४ | अध्ययनाकरिता मूल्यांकन व मूल्यमापन | ८० + २० गुण |
| बी. एड्. १०५ | प्रगत अध्यापनशास्त्र व माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे उपयोजन | ८० + २० गुण |
| | **अध्यापन विषय** | |
| बी. एड्. १०६ | शालेय विषयाचे आकलन (मराठी, हिन्दी, इंग्रजी, विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल यांपैकी २) | ४० + २० गुण<br>४० + २० गुण |
| बी. एड्. १०७ | शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र ( १०६ मध्ये निवडलेले तेच २ विषय घ्यावेत) | ४० + २० गुण<br>४० + २० गुण |
| | **प्रात्यक्षिक कार्य** | |
| बी. एड्. १०८ | अध्यापन क्षमता – १<br>अ) सूक्ष्म अध्यापन<br>आ) सेतूपाठ व अभिरूप पाठ | ५० |
| बी. एड्.. १०९ | अध्यापन क्षमता – २<br>अ) तंत्रज्ञान आधारित पाठ<br>आ) सांघिक पाठ<br>इ) प्रतिमान आधारित पाठ | ५० |
| बी. एड्. ११० | अध्यापन क्षमता – ३<br>अ) सराव पाठ<br>आ) छात्रसेवा काल | १०० |
| बी. एड्. १११ | ICT Intel | २५ |
| | सहशालेय उपक्रम व समाज सेवा | २५ |
| बी. एड्. ११२ | आरोग्य आणि योगासने | ५० |
| | एकूण | १००० |





# बी. एड्. द्वितीय वर्ष अभ्यासक्रम

| कोर्स क्रमांक | विषयाचे शीर्षक | गुण |
|---|---|---|
| | **अनिवार्य विषय** | |
| बी. एड्. २०१ | शालेय शिक्षणाची गुणवत्ता व व्यवस्थापन | ८० + २० गुण |
| बी. एड्. २०२ | ज्ञान व अभ्यासक्रम व भाषा विकास | ८० + २० गुण |
| बी. एड्. २०३ | शाळा व सर्वसमावेशक शाळा | ८० + २० गुण |
| | **विशेष अभ्यासक्रम : ऐछिक विषय** | |
| बी. एड्. २०४ | ऐछिक विषय (विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातील १ विषय) | ८० + २० गुण |
| बी. एड्. २०५ | अतिरिक्त अध्यापनशास्त्र (प्रथम वर्षातील २ अध्यापन पद्धती व्यतिरिक्त १ अध्यापन पद्धती निवडणे) | ८० + २० गुण |
| | **प्रात्यक्षिक कार्य** | |
| बी. एड्. २०६ | अध्यापन क्षमता – ४ –सराव पाठ | ५० |
| बी. एड्. २०७ | अध्यापन क्षमता ५ –छात्रसेवा काल | २०० |
| बी. एड्. २०८ | वाचन व रसग्रहण | ५० |
| बी. एड्. २०९ | स्व आकलन | ५० |
| बी. एड्. २१० | मूलभूत संशोधन | ५० |
| बी. एड्. २११ | शिक्षणातील नाट्य व कला | ५० |
| बी. एड्. २१२ | ओपन कोर्स किंवा उद्योजकता विकास | ५० |
| | एकूण | १००० |











# एम.ए.(शिक्षणशास्त्र)

B.Ed./B.P.Ed. पदवीधार विद्यार्थी, शासकीय,निमशासकीय, खाजगीशाळा/महाविद्यालयां मध्ये सेवेत असणारे शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक यांना वरिष्ठ वेतनश्रेणी व पदोन्नतीसाठी आवश्यक असणारा कोणत्याही रजेशिवाय पुर्ण करता येणारा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, संलग्नित M.Ed. साठी समकक्ष अभ्यासक्रम

**दुरस्थ शिक्षण अभ्यासक्रम ०२ वर्ष: कालावधी ०२ वर्ष**

**प्रवेश पात्रता B.Ed./B.P.Ed. उत्तीर्ण**

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे :

1. TC/LC/PAN CARD Xerox
2. B.Ed. Mark Sheet Xerox
3. Aadhar Card Xerox
4. Passport Size Photo - 01

(वरील कागदपत्रांच्या झेरॉक्स कॉपी, फोटो किंवा स्कॅन कॉपी)



## अभ्यासक्रम

### अध्यापन विषय

| अ.क्र | संकेतांक | विषयाचे नाव |
|---|---|---|
| **प्रथम सत्र (अनिवार्य विषय)** | | |
| १ | EDU-521 | शिक्षणाचे तात्त्विक यथार्थदर्शन |
| २ | EDU-522 | शिक्षणाचे सामाजिक व सांस्कृतिक यथार्थदर्शन |
| ३ | EDU-523 | संशोधन पद्धती |
| ४ | EDU-524 | सांख्यिकी तंत्राचे उपयजोन |
| **व्दितीय सत्र (अनिवार्य विषय)** | | |
| ५ | EDU-525 | शिक्षणाचे मानसशात्रिय यथार्थदर्शन |
| ६ | EDU-526 | व्यक्तिमत्वातील मानसशात्रिय यथार्थदर्शन |
| ७ | EDU-527 | अनूदेशन प्रणाली अभिकल्प |
| ८ | EDU-528 | दुर शिक्षणातील अनूदेशन अभिकल्प |
| **श्रेयांकाधारीत श्रेणी प्रणाली अभ्यासक्रम (कोणताही एक)** | | |
| ९ | GEN-121 | सायबर सिक्युरिटी |
| १० | GEN-101 | इंग्रजी |
| ११ | GEN-103 | फ्रेंच |
| १२ | GEN-104 | अरेबिक |
| १३ | GEN-105 | जर्मन |
| १४ | GEN-122 | ऑफिस टूल (इंग्रजी माध्यम) |
| १५ | MAR -549 | संवाद कौशल्ये (मराठी माध्यम) |
| १६ | GEN 204 | कम्युनिकेशन स्किल (इंग्रजी माध्यम) |





| अ.क्र | संकेतांक | विषयाचे नाव |
|---|---|---|
| | **तृतीय सत्र (अनिवार्य विषय)** | |
| १ | EDU-531 | शिक्षणातील मूल्यनिर्धारण |
| २ | EDU-532 | शिक्षणातील मूल्यमापन |
| ३ | EDU-533 | शिक्षणातील संज्ञापन मार्ग |
| ४ | EDU-534 | दूर शिक्षणातील संज्ञापन मार्ग |
| | **चतुर्थ सत्र (वैकल्पिक अभ्यासक्रम)** | |
| १ | EDU-535 | शैक्षणिक व्यवस्थापन |
| २ | EDU-536 | शैक्षणिक प्रशासन |
| | किंवा | |
| १ | EDU-537 | शैक्षणिक नियोजन -१ |
| २ | EDU -538 | शैक्षणिक नियोजन -२ |
| | किंवा | |
| १ | EDU- 539 | प्रौढ शिक्षण |
| २ | EDU -540 | निरंतर शिक्षण |
| | किंवा | |
| १ | EDU-541 | अनौपचारिक शिक्षण |
| २ | EDU-542 | अनौपचारिक शिक्षणाची भूमिका |
| | **श्रेयांकाधारित श्रेणी प्रणाली अभ्यासक्रम (कोणताही एक)** | |
| १ | GEN-203 | मूल्यशिक्षण (मराठी माध्यम) |
| २ | GEN -401 | योग शिक्षण |








यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक संलग्नित

# शालेय व्यवस्थापन पदविका (DSM)

सुट्टीतील दुरस्थ शिक्षण अभ्यासक्रम : कालावधी ०१ वर्ष

प्रवेश पात्रताः शिक्षक, पर्यवेक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक व पदवीधर

प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे : 1. TC/LC/PAN CARD Xerox 2. B.Ed. Mark Sheet Xerox 3. Aadhar Card Xerox 4. Passport Size Photo - 01

(वरील कागदपत्रांच्या झेरॉक्स कॉपी, फोटो किंवा स्कॅनकॉपी)

## शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम

| | सकेंतांक | विषयाचे शीर्षक |
|---|---|---|
| | | अनिवार्य विषय |
| १ | EDU-113 | (शैक्षणिक व्यवस्थापन)Educational Management |
| २ | EDU-114 | (कार्यालयीन व्यवस्थापन) Office Management |
| ३ | EDU-115 | (शालेय आर्थिक व्यवस्थापन)School Financial Management |
| ४ | EDU 116 | (शालेय इमारत व भौतिक सुविधा)School Building & Infrastructural Facilities |
| ५ | EDU 117 | (विद्यार्थी सेवा/कल्याण आणि विद्यार्थी गुणवत्ता विकास) Student Services/Welfare & Student Quality Development |
| ६ | EDU 118 | (मानवी संबंधांचे व्यवस्थापन)Management of Human Relationships |
| ७ | EDU 199 | (शैक्षणिक व्यवस्थापन : नवा दृष्टिकोन)Educational Management: New Approach |
| ८ | | (कृती संशोधन अहवाल)Action Research |

## गुणवंत विद्यार्थी

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | गुणानाक्रम | टककेवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २०२०-२०२१ | उजागरे निकिता दिपेंद्र | १ | ७४.९० |
| २ | | उजागरे नताशा दिपेंद्र | २ | ७४.८५ |
| ३ | | मोहिते प्राजक्ता धनंजय | ३ | ७३.१० |
| १ | २०१९-२०२० | डोके ज्योती मच्छिंद्र | १ | ७३.२५ |
| २ | | बेलकर पूजा हरिभाऊ | २ | ७२.९० |
| ३ | | डांगे मोहिनीराज रविंद्र | ३ | ७२.७५ |
| १ | २०१८-२०१९ | महाले महेश रामदास | १ | ७०.९५ |
| २ | | मंडलिक ज्ञानेश्वर विष्णू | २ | ७०.८० |
| ३ | | वैद्य धनंजय मधुकर | ३ | ६९.६५ |
| १ | २०१७-२०१८ | शिरगावकर निकिशा नवनाथ | १ | ७२.९० |
| २ | | डुंबरे अपेक्षा चंद्रकांत | २ | ७०.९५ |
| ३ | | बाम्हणे सचिन बाळू | ३ | ७०.३० |
| १ | २०१६-२०१७ | क्षिरसागर अनिता लक्ष्मण | १ | ७४.८० |
| २ | | क्षिरसागर प्रज्ञा नंदकुमार | २ | ७३.२५ |
| ३ | | अहिनवे अश्विनी उल्हास | ३ | ७१.८० |

# क्षणचित्रे



राज्यस्थरिय शिक्षणशास्त्र महाविद्यालय लोकनृत्य स्पर्धेचे उद्घाटन



ज्ञान विलास वक्तृत्व स्पर्धेत मान्यवरांचा सत्कार



डॉ. वेदाला रामा शास्त्री मा. कुलगुरू
डॉ. बाबासाहेबांना आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ



ज्ञान विलास वक्तृत्व स्पर्धेच्या विजेत्यांसह मान्यवर



पथनाट्य



स्वागत गीत



ज्ञान विलास वक्तृत्व स्पर्धेत सादरीकरण करताना सहभागी विद्यार्थी



ज्ञान विलास वक्तृत्व स्पर्धेत मार्गदर्शन करताना
अध्यक्ष मा. विशाल तांबे सर



पथनाट्य



नेताजी सुभाषचंद्र भोस जयंती



प्रजासत्ताक दिन २०२१



पाककला स्पर्धा



शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा



बालिका दिन



बी. एड. प्रथम वर्ष स्वागत समारंभामध्ये उपस्थित मान्यवर







महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करताना



बी. एड. प्रथम वर्ष स्वागत समारंभामध्ये उपस्थित विद्यार्थी



युवक दिन व जिजाऊ जयंती



शालेय व्यवस्थापन पदविका संपर्क सत्र



शिक्षक दिन २०२१

# शिवजयंती २०२१





शिवजयंती २०२१



शिवजयंती २०२१





लेझिम पथक



मैदानी खेळ

Estd. 9th Aug 1990

## Shri Gajanan Maharaj Shikshan Prasarak Mandal

### List of the Educational Institutions run by Trust / Society

- Vilas Tambe College of Education (B.Ed.), Dumbarwdi, Otur, Dist- Pune
- Sharadchandra Pawar Arts & Commerce College, Dudulgaon, Alandi, Pune
- Ramchandra Patil Auti Junior College of Arts, Commerce (Alandi, Dist- Pune)
- Sharadchandra Pawar Institute of Pharmacy (D. Pharmacy, B. Pharmacy & M. Pharmacy), Dumbarwdi, Otur, Dist- Pune
- Dnyanvilas College Of Pharmacy ( D. Pharmacy & B. Pharmacy), Dudulgaon, Alandi, Pune
- Sharadchandra Pawar Institute of Management (M.B.A.) Dumbarwadi, Otur, Dist- Pune
- Sharadchandra Pawar College of Engineering, Dumbarwadi, Otur, Dist- Pune
- Aditya English School (Play Gr. Jr. K.G. & Sr.K.G.) Alandi, Dist. Pune
- Vision International School Dumbarwadi, Otur, Dist-Pune
- Savitribai Phule Vidyalaya, Otur, Dist- Pune .
- Veer Sawarkar Vidyalaya, Pangrimatha, Dist-Pune.
- Sharadabai Pawar Vidyalaya, Ambegavhan, Dist, Pune
- Raja Shiv Chatrapati Vidyalaya, Dudulgaon, Alandi, Dist. Pune
- Sitabai Tambe Junior College for Girls, Otur, Dist-Pune
- Pratibhatai Pawar Prashala, Otur, Dist-Pune.
- Shri Gajanan Maharaj Kanya Chatralaya, Otur, Dist- Pune


श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे

## विलास तांबे शिक्षणशास्त्र महाविद्यालय

## (बी.एड्.)

डुंबरवाडी(ओतूर) .ता जुन्नर, जि पुणे ४१०५०४    फोन:  ९९६०९६४३८१, ९५५२५१७५००

www.vtcoe.com    : Vilas-Tambe-College-Of-Education-Otur-Pune    wcoeotur@gmail.com,